| MHAU100005672024 | नियमित दिवाणी दावा क्र./100/2024<br><br>राजु मिठ्ठु होळकर वि. कांताबाई मिठ्ठु होळकर. |
|---|---|

## निशाणी २२ खालील आदेश

अर्जदार प्रभाकर महादु होळकरने दिवाणी संहिता प्रक्रिया १९०८ चे आदेश १ नियम १० नुसार प्रकरणात अर्जदाराला आवश्यक पार्टीधारक म्हणून समाविष्ट करण्याबाबत अर्ज दाखल केला.

०२. अर्जदारांनी असे कथन केले की, वादमिळकत प्रतिवादी क्र.१ कडून नोंदणीकृत खरेदीखत क्र.६५४/२०२५ द्वारे दिनांक २७.०३.२०२५ रोजी रुपये २,९७,०००/- खरेदीखताद्वारे घेतलेली आहे. अर्जदाराने खरेदीखतानंतर फेर घेण्यासाठी संबंधित महसुल अधिका-याकडे अर्ज दाखल केला असता त्यास वादीने आक्षेप घेतला. तसेच वादीने प्रकरणात नि.क्र.०५ वर आदेश घेवुन अर्जदाराच्या फेरला स्थगिती घेतली.

०३. वादीला ही बाब माहीती होती की, प्रतिवादी क्र.१ ने वादमिळकत अर्जदाराला विक्री केली. परंतु ही बाब वादीने हेतुपुरस्कर न्यायालयापासून लपवुन ठेवली. त्यामुळे अर्जदारास सदर प्रकरणात हजर होवुन आपली भुमिका मांडणे गरजेचे आहे. करीता अर्ज मंजुर करण्याची विनंती कली.

०४. याउलट, वादीने नि.क्र. २३ वर म्हणणे मांडून अर्ज फेटाळण्याची विनंती केली. वादीने असे नमूद केले की, वादमिळत ही वादीची वडीलोपार्जित मिळकत असून प्रतिवादी क्र.१ ने अर्जदाराला करुन दिलेले खरेदीखत बोगस आहे. अर्जदाराने वादमिळकत विकत घेतली नसून ती हडप करण्याचा डाव असल्याने अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

०५. वादीने सदर प्रकरण प्रतिवादींविरुध्द निरंतर मनाई हुकूम मिळण्याबाबत दाखल केले

आहे. यामध्ये अर्जदाराने पक्षकार समाविष्ट होण्याकरीता सदरील अर्ज दाखल केला. अर्जदाराने असे कथन केले की, प्रतिवादी क्र.१ ने अर्जदाराला वादमिळकत खरेदीखता आधारे विक्री केली. वादीने म्हणणे दाखल करुन सदरील बाब मान्य केली असून खरेदीखत बोगस असल्याचे कथन केले. ज्याअर्थी वादीने अर्जदाराने खरेदीखत वादमिळकतीचे केले असल्याचे मान्य केल्याने अर्जदार हे आवश्यक पक्षकार असल्याचे दिसून येते. त्यामुळे सदरील प्रकरण हे योग्यरित्या व न्यायोचित चालण्या कारणाने सदरील अर्जाकरीता खालील आदेश पारीत करण्यात येतो.

**आदेश**

१. सदरचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. अर्जदाराला प्रतिवादी क्र.३ म्हणून दाव्यात समाविष्ट करण्यात येते.

३. वादीने सदरील दावा दुरुस्त करुन दुरुस्ती दावा पुढील तारखेपर्यंत दाखल करावा.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by GANESH DATTA GURNULE
Date: 2026.04.09 18:09:08 +0530

दिनांक -०९/०४/२०२६.

(**जी.डी. गुरनुले**)
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,खुलताबाद.
(न्यायालय क्र.०२)